MHAH190016512022

<u>क्रिमीनल चौकशी अर्ज क्र. २८८/२०२२ मध्ये नि.१ वर आदेश</u>

( कडूबाळ यशवंत आवारे  विरुध्द तहसील कार्यालय, शेवगाव )

१. अर्जदाराने जन्म मृत्यू कायदा २००० चे कलम ९ (३) प्रमाणे मृत्यूचे नोंद प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

अर्जदाराची केस थोडक्यात खालीलप्रमाणे -

२. अर्जदार हे शहरटाकळी, ता. शेवगाव जि. अहमदनगर येथील रहिवासी असून त्यांचा जन्म दि. ०५/०७/१९६४ रोजी मौजे शहरटाकळी, ता. शेवगाव येथे झालेला आहे. त्यांच्या जन्माची नोंद अनावधानाने ग्रामपंचायत दप्तरी करणे राहून गेले आहे. अर्जदार यांना जन्माच्या दाखल्याची सरकारी कामासाठी आवश्यकता आहे. अर्जदार यांनी सामनेवालाकडे जन्माच्या प्रमाणपत्राची मागणी केली असता संबंधितांनी सन १९६४ चे जन्ममृत्यू नोंदणी रजिस्टरला अर्जदाराच्या जन्माची कोणत्याही स्वरुपाची नोंद आढळत नाही असा दाखला दि.२७/०९/२०२२ रोजी अर्जदारास दिला व सांगितले की, सदर जन्माची नोंद ही मुदतीत केली नसल्याने मे. कोर्टाच्या आदेशाशिवाय जन्म रजिस्टरला नोंद करता येणार नाही. त्यामुळे अर्जदार यांनी जन्माची नोंद होण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदाराने त्याचे अर्जाचे पुष्टयर्थ नि.३ वरील वर्णनयादीसोबत तहसील कार्यालय यांच्याकडील दि. २७/०९/२०२२ च्या दाखल्याची मूळ प्रत, नि.७ सोबत दैनिक प्रभात या दैनिक वृत्तपत्राची मुळ प्रत, सायटेशन नोटीस नि.१४, अर्जदाराचे प्रतिज्ञापत्र नि.९ दाखल केले आहे. अर्जदारातर्फे साक्षीदार बापूसाहेब शंकर खरड यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि. १० वर दाखल केले आहे. नि.१३ सोबत अर्जदाराने त्याचे आधारकार्डची झेरॉक्स प्रत जोडली आहे त्यावर अर्जदाराचे जन्म तारीख ०५/०७/१९६४ अशी नोंद आहे. अर्जदाराने दि.०३/११/२०२२ रोजीचे अर्जासोबत तहसीलदार, शहरटाकळी, शेवगाव यांच्यासमोर

केलेले प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यामध्ये अर्जदाराने शपथेवर असे नमूद केले आहे की अर्जदाराच्या शाळा सोडल्याचे दाखल्यानुसार अर्जदाराची जन्म तारीख ०५/०७/१९६४ आहे. त्याचप्रमाणे सदर प्रकरणात नि.७ मधील वर्णनयादीसोबत दैनिक वृत्तपत्रात सदर नोंदीबाबत हरकत, आक्षेप मागविण्यात आले. परंतु सदर अर्जास कोणीही व्यक्तीने कोणत्याही प्रकारची हरकत घेतलेली नाही. सबब अभिलेखावरील सदर सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता ही बाब स्पष्ट आहे की, अर्जदार यांचा जन्म दि.०५/०७/१९६४ रोजी झाला. परंतु त्यांच्या जन्माची नोंद सामनेवालाचे रेकॉर्ड सदरी नाही. सदर बाबीला एक वर्षापेक्षा अधिक काळ झाल्याने तशी नोंद या न्यायालयाच्या आदेशाने करणे गरजेचे आहे. त्यामुळे, जन्म मृत्यू नोंदणी कायदा कलम १३ अन्वये सदर अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. संबंधीत सामनेवाला यांनी अर्जदार नामे कडूबाळ यशवंत आवारे हयांची दिनांक ०५/०७/१९६४ रोजीच्या जन्माची नोंद योग्य ती फी आकारुन अभिलेखावर करावी.

SANJANA UDAY JAGUSTE
Digitally signed by SANJANA UDAY JAGUSTE
Date: 2023.01.11 11:43:05 +0530

ठिकाण – शेवगाव
ता.१०/०१/२०२३

(श्रीमती एस. यू. जागुष्टे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, शेवगाव